# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


महत्वाचे

क्रमांक विकाअ/शिक्षण/मिटींग/२०१६/3168

दिनांक :- 29 SEP 2016

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व पदवीका संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- अवयवदान जन जागृती करण्याबाबत महा अवयनदान अभियान सन २०१६.**

संदर्भ :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १०/एनजीपी/अवयवदान/२०१६/१२०५ दिनांक २० सप्टेंबर २०१६.

२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्रमांक :- संकिर्ण ११११/(प्र.क्र.१०४/१६)/समन्वय दिनांक ३१/८/२०१६.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शिक्षणाच्या माध्यमातुन भावी पिढी निर्माण होत असते, त्याअनुषंगाने अवयवदानाच्या कार्यक्रमाच्या आयोजनातुन सर्व स्तरावरील विद्यार्थ्यामध्ये अवयवदानाचे महत्व या विषयी जागृती निर्माण करणे आवश्यकम आहे. त्यानुसार आपल्या संस्थेमध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना भरावयाच्या प्रवेश अर्जामध्ये मृत्युपश्चात अवयवदान करण्यास तयार आहेत किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात यावी. त्यानुसार इच्छुक दात्यांना अवयवदान नोंदणी अभियान कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात यावे. तसेच याबाबत महाविद्यालयाकडुन सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मदतीने अवयवदान कार्यक्रम राबविण्यात यावा व अभियानाच्या कार्यक्रमात मोठया प्रमाणाव युवा वर्ग सामील होण्याचे दृष्टीने नियोजन करावे. तसेच सोबतच्या परिपत्रकात नमुद वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्य विभागाच्या संदर्भाधीन दिनांक ६/८/२०१६ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करावे.

**सहपत्रे :- संदर्भाधीन शासन निर्णय व**
**दिनांक ६/८/२०१६ च्या शासन निर्णयाची प्रत.**

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- **प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

अवयवदान जनजागृती करण्याबाबत
महा अवयवदान अभियान सन २०१६.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण -१११९/(प्र.क्र.१०४/१६)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ३१ ऑगस्ट, २०१६.

पत्र प्राप्त झाले
8 SEP 2016
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १.

वाचा :- वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.जागृती-०७१६/ प्र.क्र.३२ / अधिनियम, दि.६ ऑगस्ट, २०१६

शासन परिपत्रक -

शिक्षणाच्या माध्यमातून भावी पीढी निर्माण होत असते. अवयव दानाच्या कार्यक्रमाच्या आयोजनातून सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये अवयवदानाचे महत्व या विषयी जागृती निर्माण करणे आवश्यक आहे.

२. या विभागाच्या अखत्यारीतील, महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना भरावयाच्या प्रवेश अर्जामध्ये मृत्यूपश्चात अवयव दान करण्यास तयार आहेत किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात यावी. त्यानुसार इच्छुक दात्यांना अवयवदान नोंदणी अभियान कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात यावे. याबाबत राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयांकडून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मदतीने अवयवदान जागृती कार्यक्रम राबविण्यात यावा व अभियानाच्या कार्यक्रमात मोठया प्रमाणात युवा वर्ग सामील होण्याच्या दृष्टीने नियोजन करावे.

३. तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या संदर्भाधिन दि.६.८.२०१६ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निदेशाप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१६०९०११३०१४०११०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि.गो.चांदेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
आवक क्र. शा - २३९३६
दिनांक ९.८.९.१६

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.